...मला पूर्ण विश्वास आहे कीं अशी कोणतीच शक्ति नाहीं जी आमचें तें स्वातंत्र्य हिरावून घेईल, जें आम्ही एका युगानंतर इतक्या कष्टांनीं, श्रमांनीं व त्यागानें मिळविलें आहे. पण स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं व आपल्या देशाच्या प्रत्येक भागाला या देशांतच ठेवण्यासाठीं आम्हांला जय्यत तयारी करायला हवी, कंबरा कसायला हव्या. मला मुळींच शंका नाहीं कीं आम्ही यशस्वी होऊं...

...आम्हांला मोठें ओझें उचलायचें आहे. आम्हां सर्वांना, आमचा धंदा कोणताहि कां असेना, स्वातंत्र्याची किंमत पुरेपूर द्यावी लागते. आणि जेव्हां आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा व आपल्या जनतेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न असेल, तेव्हां कोणतीहि किंमत जास्त म्हणतां येणार नाहीं...

जवाहरलाल नेहरू

(राष्ट्राप्रत संदेश– २२–१०–६२)

Library IIAS, Shimla
H 891.461 6 Sa 19 B
00055440



Bharat-Geet

H
891.461 6
Sa 19 B

# भारत-गीत

Library IIAS, Shimla
H 891.461 6 Sa 19 B
00055440

या संकलनांत आधुनिक मराठीच्या श्रेष्ठ कवींच्या राष्ट्रीय कविता एकत्र केल्या आहेत. मराठींत आरंभापासूनच राष्ट्रीय काव्याची अजस्र धारा प्रवाहित होत आली आहे. त्या काव्याच्या स्वातंत्र्य भावनेनें व ओजस्वितेनें जनतेला नेहमींच प्रेरणा मिळाली आहे. हें लहानसें संकलन हल्लींच्या प्रसंगीं आम्हांला कर्तव्यपालनाकडे प्रवृत्त करील अशी आशा आहे. संकलित कवींनीं आपल्या रचना प्रसिद्ध करण्याची परवानगी देऊन आम्हांला जें सहकार्य दिलें आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

**साहित्य अकादेमी, नवी दिल्ली**

891.4616
Sa 19 B
55440
15.11.76
15/12

**केशवसुत**

*( कृष्णाजी केशव दामले : १८६६ - १९०५ )*

# तुतारी

एक तुतारी द्या मज आणुनी,
फुंकिन मी जी स्वप्राणानें
भेदुनि टाकिन सगळीं गगनें—
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें;
अशी तुतारी द्या मजलागुनि...

जुने जाउंद्या मरणा लागुनि,
जाळुनि किंवा पुरुनी टाका,
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध ! ऐका पुढल्या हांका ?
खांद्यास चला खांदा भिडवुनि !

प्राप्तकाल हा विशाल भूधर,
सुन्दर लेणीं तयांत खोदा
निज नामें त्यांवरती नोंदा
बसुनी कां वाढवितां मेदा ?
विक्रम कांहीं करा, चला तर !...

संघशक्तिच्या भुईंत खंदक
रुंद पडुनि शें तुकडे झाले,
स्वार्थनिपेक्ष जीवीं अपुले
पाहिजेत ते सत्वर भरले;
घ्या त्यांत उड्या तर बेलाशक !...

जाऊं बघतें नांव लयाप्रत
तशांत वनलां मऊ मेंढरें,
अहह ! घेरिलें आहे तिमिरें,
परंतु होऊं नका बावरे—
धीराला दे प्रसंग हिंमत ! ...

पूर्वीपासुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती ;
सम्प्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरविती !
देवांच्या मदतीस चला तर !

**‘ बी ’**

*( नारायण मुरलीधर गुप्ते : १८७२ - १९४७ )*

## प्रभात-पोवाडा

उठा उठा नरनारी ! आतां रात्र होय सरती
सूर्योदयकाळाचे शाहिर ललकारी देती ...
डाव मांडिला पांची प्राणा लावुन पैजेला
कोण जिवाचे साथी ? या ते साहस कर्माला.
स्थैर्याचे धैर्याचे क्षत्रिय वृत्तीचे असती
वाण सतीचें त्यांनीं घ्यावें हें उचलुन हातीं.
पुरुषार्थाची एक सिद्धि कीं सर्वस्वीं घात
साहसांत या शिवरायाची तुमच्यावर भिस्त.
अमर्याद सत्तावळ अगणित दळबळ शत्रूला
रणोन्माद उद्दाम जिद्द बेहोष करी त्याला.
विक्रमसागर त्याचा बुडवी उत्तर देशाला

लोट तयाचे धडका देती दक्षिण दाराला
थोप थांबवायाला ती सह्याद्रि पुढें सरला
प्रचंड तो गिरिराज खरा पण आला टेकीला.
करुन चढाई फौजा आल्या भिडल्या दाराला
गड किल्ले कांपती साहतां त्यांच्या माऱ्याला.
महाराष्ट्रधर्माचें आहे क्षात्रकर्म बीज
'आब आज जाताहे' राखा भाई हो! लाज.
शत्रुसंघ पाहतां दाट बेछूट शूर होती
शिरा शिरा ताठती, अचाट स्फुरणें संचरतीं.
समरशूर गर्दींत एक बेधडक भिडुन मिसळे
शत्रुभार संहारकर्म विक्राळ परम चाले.
तुच्छ तनुब्रह्माण्ड चंड संग्रामकैफ चढतो
प्रशंसितां तुंबळ द्वेष लंगडा शब्द पडतो.
डंक्यावरती टिपरी पडली; हुकुम जमायाचा.
चला मराठे चला! वख्त हा आणीबाणीचा.
एक एक हंबीर वीर हा वर्णवे न कांहीं
जय करण्याची चिंता अंबा जगदंबा वाही.

**विनायक**

*( विनायक जनार्दन करंदीकर : १८७२-१९०९ )*

## पद्य

स्वातंत्र्यास्तव कोण प्राणी सिद्ध न मरणाला ?
धिक्कार असो परवशतेच्या हीन जीविताला !
आर्यभूमि घायाळ जाहली रक्तानें न्हाली—
उठा करा संरक्षण—जन हो तिचें यथाकालीं.

पारतंत्र्यशृंखला वाजते पायीं खळखळ ते—
कर्कश रव नायकवें तीचा हृदय विद्ध होतें !
अन्नाची रुचि हरी जल पितां जालिम विष गमतें;
नको नको ही स्थिती वहु बरें मरण तयापरतें !
पुत्र खरा जो होय संकटीं जननीचा वाली—
सर त्याची येई न अरीच्या अगणित सैन्याला !

**दत्त**

*( दत्तात्रेय कोंडो घाटे : १८७५-१८९९ )*

## आमंत्रण

चला मावळे वीर हो ! या घडीला;
धनी संगरा बोलवीतो तुम्हांला;
लढाया चला सोडुनी सर्व काज,
रणीं दाखवा शत्रुला शौर्य आज.

चला सज्ज व्हा, घ्या यशस्वी हत्यारें,
चला ज्वान हो ! वृद्ध हो ! आज सारे,
चराया गुरें राहुं द्यावीं वनींच,
असें सांगतों मी न, सांगे धनीच.

त्यजा चालत्या नांगराला तसाच;
धन्याची करा चाकरी आज साच.
पुरे तोडणें वृक्ष, घ्यावी कुठार,
रणीं शत्रुला मारण्या आज ठार.

पुरे जेवणें, हातचा घांस टाका
उठा सज्ज व्हा, दुंदुभीनाद ऐका;

नका घालवूं वेळ होतो उशीर,
रणीं पाहतें शत्रुचें वाट शीर.

उठा आवळा कंबरा वेळ झाला;
चला ढाल घ्या खड्ग घ्या लांब भाला.
कुणी गोफणी तीर वा घ्या कृपाण;
अरी-संगरीं माजवावें तुफान.

निघा सत्वरीं वादळीं जेंवि लाटा;
चला वेळ झाला, धरा चोरवाटा,
जमा इष्ट जागीं, पळा वायुवेगें
त्यजा आळसा चित्त ठेवा न मागें.

**विनायक दामोदर सावरकर** *( १८८३ )*

# स्वतंत्रतेचें स्तोत्र

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतं वंदे ।। ध्रु. ।।

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति संपदांची
स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञी तूं त्यांची . . .
तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची
मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती
जें जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें
हे अधम-रक्त-रंजिते ! सुजन-पूजिते । श्रीस्वतंत्रते

तुजसाठिं मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण
भारतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतं वंदे ।।

**गोविंदाग्रज**

*( राम गणेश गडकरी : १८८५ – १९१९ )*

## दसरा

जुन्या मतांचा जाळा कचरा !
नव्या मताचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा !

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उम्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालच दसरा !

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे वरकंदाज
चला जमूं द्या जमाव तुमचा
काळाचें मैदान अफाट

दिसतां कोठे खंदक खांचा
द्या घोड्याला अमीन टाचा
वाऱ्यावरती करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !

चला उठा रे बांधा कंबर
तुमच्यापुरती ही घी-शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर
युद्ध माजवा रे घनचक्कर
फोडा कुजकें हे अवडंबर !

अंतकाळचें हें मैदान
हिंमतवाले चाबुकस्वार
उत्साहाची करिं तलवार
चित्साक्षीची ढाल तयार
घोडा फिरवा रानोरान.

**बालकवि**

*( त्र्यंबक बापूजी ठोमरे : १८९० – १९१८ )*

# वीर मराठा

काळामुखीं पण वावरणारा रणदेवीचा पंचीप्यारा.
वीर्याचा अतिरेकच नुसता वीर बाल तो कुमार होता.
रणक्षेत्र तें बघुनी नयनीं प्रस्फुरला वीर्याग्निकणांनीं;
ज्योत नळी फोफावुन झाली लाललाल वदनावर आली.
दृष्टींतुनि फूत्कारच ओती उग्र नागिणी मनस्विता ती;
रणदेवीचा हृदयमणी तो, विचारीं यापरी झुलतो
शूरवीर समरांगण गाजी निजपूर्वज बघतो तो आजी

तीं मैदानें प्रदेश सारा आज अपूर्वच दिसतो त्याला
समोर दिसतें रणस्थान तें हृदय नाचतें अमुचें तेथें
शौर्यासाठीं शूरापोटीं रणांगणाच्या घ्याथा गांठी
रजपुताचे आम्ही छावे, मरण मारणें आम्हां ठावें.
मी समरीं रणशूर बनोनी इच्छितसें खड्गाचें पाणी.

दुर्ग गजबजे बसल्या थापा घोडयांच्या टपटपल्या टापा
वीर मराठे दिसले लपले; निस्तब्ध पुन्हां कानन डोले.
कृष्णरात्रिची भयाण वेळ, रान सभोंती जड जंजाळ
शौर्य देवता परी नाचते कडया-कडयांतुनि जेथें तेथें.

**गिरीश**

*( शंकर केशव कानेटकर : १८९३ )*

# धन्य राष्ट्र !

प्राणस्वर फुङ्कुन जोरानें । गर्जे वीरश्रींत तुतारी,
साथ देउनी पडघम बोले । " चला 'सज्ज व्हा करा तयारी ! "
आणि सूचना ही युद्धाची । समजुन उठले सैनिक सारे
सावरुनी शस्त्रास्त्र ठाकले । ' मरूं-मारूं ' चे भरुनी वारें.
मायभूमिच्या प्रतिष्ठेस जे । जुलमी गर्वे देतिल धक्का
पाताळीं त्या रेचुन खालीं । वदति वाजवूं विजयी डंका.
वीरश्रीनें असल्या भरुनी । तेजस्वी हृदयें तरुणांचीं
देशासाठीं उठलीं सारीं । भीति झुगारुन क्षणि मरणाची.
कुणी पायदळ, कुणी हवाई । आरमार कुणी गांठी झटकन्
सरवत्तीवर रणगाडयांच्या । अरि माराया जाई पटकन्
दारूगोळा कुणी ठासुनी । शत्रुविमानें पाडी वीर
शहर रक्षणा कुणी राहिले । मायलेकरां देउनि धीर.

अनेक यंत्रालयें आपुलीं । शांतपणानें करिती कामें
नव संशोधनिं रतले कोणी। देशाची उच्चारुनि नामें
कुणी पुत्रिका सेवाधर्म । स्वीकारुनि जाहल्या सेविका,
आगीमध्यें कुणी जाउनी । सेविति रणशूरास बालिका.
प्रखर भडकली रणकुंडाची । आग भयंकर जळभूव्योमीं,
पाहुनि सरले सुपुत्र पुढती । उडि घालाया विषार धूमीं.
बालबालिका युवयुवतीजन । मायभूमिच्या जयजयकारें,
आले पुढती प्रेरित होउनि । वीरश्रीच्या नव हुङ्कारें !
बाळगुनिया मातृभूमिची । असीम उत्कट तळमळ पोटीं
धिमेपणानें करिती सारे । मंत्र भूमिचा ठेवुनि ओठीं
धन्य राष्ट्र तें ! धन्य पुत्र ते !! धन्य पुत्रिका धारातीर्थी–
मायभूमिच्या कल्याणास्तव । धावुनि, देती जे आत्माहुति ! !

**यशवंत**

*( यशवंत दिनकर पेंढरकर : १८९९ )*

## गाउं त्यांना आरती

सङ्गरीं वीराग्रणी जे धैर्यमेरु सङ्कटीं
जन्मले या भारती

राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरी ज्यांना मृती
गाउं त्यांना आरती

कोन्दला अन्धार मार्गीं खाचखड्डे मातले
तस्करांनीं वेढिलें
सम्भ्रमीं त्या जाहले कृष्णापरी जे सारथी
गाउं त्यांना आरती

देश ज्यांचा देव, त्याचें दास्य ज्यांचा धर्म हो
दास्यमुक्ति ध्येय हो
आणि मार्कण्डेयसे जे जिङ्किती काळाप्रती
गाउं त्यांना आरती
देह जावो, देह राहो नाहीं ज्यांना तत्क्षिती
लोकसेवा दे रती
आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती
गाउं त्यांना आरती
जाहल्या दिङ्मूढ लोकां अर्पिती जे लोचनें
क्षाळुनी त्यांचीं मनें
कोटिदीपज्योतिशा ज्यांच्या कृती ज्यांच्या स्मृती
गाउं त्यांना आरती.

**अनिल**
*( आ. रा. देशपांडे : १९०१ )*

## भग्नमूर्ती

पाहा ! तुमची सर्व संस्कृति
रक्षणतंत्राच्या उपेक्षेनेंच
ढासळली आणि उध्वस्त झाली
मोडून टाकिली विध्वंसकांनीं
आकुंचित निरर्थक मर्यादा
घालीत बसलां रिकामपणीं
वाढवीत निज भेदभावाला
जातीजातींच्या, पंथापंथांच्या

मोडून टाकीत ऐक्यभावना
संघशक्तीची.
पाहा ! स्वतःच्या रक्षणासाठीं
वाढवावी लागे स्वत्वाची व्याप्ति
संस्कृतीच्या ऐक्यभावना भोंतीं
मेळवून तिच्या सर्व बाळांना
स्वकीय भावना प्रेरावी लागे
तयां सर्वांत.
मोडून क्षुल्लक, कृत्रिम, भेद
विस्तारावें लागे जीवनक्षेत्र
सर्व देशाचें संवेदनामय
बनवावें लागे एक शरीर
एक हृदय !
आपुली संस्कृति, आपुली कला,
आपुलें ऐश्वर्य, आपुलें वित्त,
आपुलीं मंदिरें, आपुला देश
रक्षावयाला सदा सुसज्ज
जेव्हां राहतात सारेच लोक
ओळखून जीवनैक्य सर्वांचें–
तेव्हांच नांदतें शक्तिसामर्थ्य
स्वरक्षणाचें, प्रतिकाराचें.

**बाळकृष्ण भगवंत बोरकर** ( १९१० )

## हुषार भाई !

हुषार भाई, हुषार भाई !
हाकेवर ये भाग्य आमुचें

लवाजम्याचें वाजत गाजत
पुरुषार्थाचीं शस्त्रें वस्त्रें
चढवुनि व्हा रे सज्ज शिपाई
क्रांतीचा जयघोष करा रे
आणि पुकारा संगर यात्रा
हे अंड्यांतिल महाकवींनो !
कवचामध्यें खुपसुनि माना
कुशीउशीचा देत उबारा
शतकें किति पहुडाल किड्यांपरि ?
उत्प्लवनें पहिल्याच गड्यांनो
स्वर-पंखांच्या संचाराला
उणी करा रे भुवनें-गगनें
शिंगें कर्णे झांज नगारे
रणवाद्यें या फुंकित वडवित
भैरव तांडव करा देशभर
हर हर हर सावेश गर्जुनी
रुद्र करा भारतभर जागा !
विशाल तुमचीं सोज्ज्वळ हृदयें
धाडधाड लागोत जळाया.
त्या ज्वालांच्या तालावरती
कंठ फुटे तों गा रे गाणीं ! . . .
. . . करा भीमवळ सारी सेना ! . . .
तिलांजली द्या सर्वस्वावर
आणि दृष्टिचें तेज वाढवा
विराट तेजें प्रगटुनि दाविल
विश्वरूप दर्शनें तुम्हांला.

**कुसुमाग्रज**

*( विष्णु वामन शिरवाडकर : १९१२ )*

## आव्हान

बलवन्ता, आव्हान्
बळीचे बलवन्ता, आव्हान्
असेंच चालुं दे चहूंकडूनि अखण्ड शरसंधान् !
रक्तानें न्हाली
तनू ही रक्तानें न्हाली
आणि चाळणी जरी छातिची पिंजुनिया झाली—
काळजांत उठती
कळा जरि काळजांत उठती—
बळी गिळाया घारगिधाडें घोटाळत वरती !
लवहि न आशंका
परन्तु लवहि न आशंका
समर पुकारित राहिल नित हा रणशाली डंका !
बुरुजावरति निशाण्
उभें हें बुरुजावरति निशाण्
किरीट उज्ज्वल चढो शिरावर वा होवो शिरकाण् !

**वा. रा. कान्त** *( १९१३ )*

## हिमालयास

निज असीम हिममय तपःशांति सोडूनी
हिमनगा; खवळ तूं अग्निगिरी होउनी !

जडभरतापरि तूं स्तब्ध किती बसशिल ?
निर्लज्ज किती युगें उदास तूं बघशिल ?
का पांडुर झालें रक्त तुझें गोठुनी ?
हिमनगा खवळ तूं अग्निगिरी होउनी !

ह्या गंगायमुना अश्रूधार वाहूनी
तव व्यथाभार हलका नच करितिल कुणी
तूं त्रिनेत्र उघडी, तुहिन जटा आपटुनि
हिमनगा, खवळ तू अग्निगिरी होउनी !

शशितारामंडित भालावरि गिरिवरा
अरिलता साहशि किती चंद्रशेखरा
तूं प्रलय-तांडवा वीरभद्र, उठ झणी
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी !

**विंदा करंदीकर**

*( गोविंद विनायक करंदीकर : १९१८ )*

## विजयी भारत

विजयी भारत, विजयी भारत, विजयी भारत प्यारा !
मुकुट हिमाचल अचल शिरावरि;
निर्मल गंगा हृदय स्थलावरि;
सागर चाकर पदकमला चुरि;
दिशांदिशांतुन वाहे जेथें पवित्रेचा वारा.

अशोक, विक्रम, चंद्रगुप्त तव,
प्रताप, गुरुगोविंद, तुझा शिव,

धन्य धन्य भारत तेजार्णव.
पूर्वेच्या हृदयांतिल उगवे जगतोद्दीपक तारा

घे वीरांच्या हृदयाचे गड
त्यागांच्या तोफांची धडधड
प्रीतीच्या झेंडयाची फडधड
जिवंत चाळिस कोटी जळत्या तलवारीच्या धारा.

**वसंत बापट** *( १९२२ )*

## सदैव सैनिका पुढेंच जायचें

सदैव सैनिका पुढेंच जायचें
न मागुती तुवां कधीं फिरायचें

सदा तुझ्यापुढें उभी असे दिशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मधेच या विजा भयाण हासती
दहा दिशांतुनी तुफान व्हायचें
सदैव सैनिका पुढेंच जायचें

प्रलोभनें तुला न लोभ दाविती
न मोहबंधनें पदांस बांधिती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न मोह भास तो गजांत वैभवी
न दैन्य ही तुझें कधीं सरायचें
सदैव सैनिका पुढेंच जायचें

वसंत वा शरद् तुला न ती क्षिती
नभांत सूर्य वा असो निशापती !
विशीर्ण वस्त्र हो विदीर्ण पावलें
तरी न पाय हे कधीं विसावले !
न लोचनां तुवां सुखें मिटायचे
सदैव सैनिका पुढेंच जायचें

नभांत सैनिका प्रभात येउं दे
खगांसवें जगा सुखांत गाउं दे
फुलांफुलांवरी सुवर्ण शोभु दे
जगास शांतता सुहास्य लाभुं दे
न पाय तोंवरी तुझे ठरायचे
सदैव सैनिका पुढेंच जायचें

INDIAN INSTITUTE OF ADVANCED STUDY
55440
15.11.76

*Bharat-Geet*—Select patriotic poems by eminent poets in Marathi. Compiled by Sahitya Akademi, **New Delhi** ( December, 1962 ). Price **30** n. P.

प्रथम आवृत्ति, डिसेंबर

© साहित्य अकादेमी [illegible] दिल्ली

मुखपृष्ठावरील चित्र :
श्री.
भवेश सान्याल

संगम प्रेस, पुणें येथें मुद्रित

मूल्य : तीस नवे पैसे.